# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## जाहिर निवेदन

### कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) भरतीबाबत

महापालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता स्थापत्य संवर्गातील रिक्त पदे भरणेकरिता दिनांक ४/२/२०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे. सदर जाहिरातीमधील अपंग उमेदवारांच्या सामाजिक आरक्षणाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक न्याय-२००७/स.न्या/प्रक्र १०३(भाग-३)/१६-अ दिनांक १९/१०/२००७ नुसार अपंगांची आरक्षीत पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येवून अपंगाची पद भरती करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्देशानुसार दिनांक ४/२/२०१३ रोजीचे जाहिरातीमध्ये इमाव प्रवर्गात अपंगाचा अनुशेष दर्शविणेत आला असला तरी इमाव प्रवर्गातून अपंगाचे पद भरता येणार नाही. यास्तव सद्यस्थितीमध्ये इमाव प्रवर्गातून अपंगाचे १ पद न भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी इमाव प्रवर्गातील जे अपंग उमेदवार कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदाचे लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत त्यांना इमाव प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार समजणेत येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे जाहिरातीमध्ये कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदासाठी अनु.जाती प्रवर्गाकरिता १ पदाचा तर इमाव प्रवर्गाकरिता ३ पदाचा असा एकूण ४ पदांचा अनुशेष नमूद करणेत आला आहे. तथापि सद्यस्थितीत या प्रवर्गांमध्ये अनु.जाती प्रवर्गाकरिता २ पदांचा तर इमाव प्रवर्गाकरिता ५ पदांचा असा एकूण ७ पदांचा अनुशेष असल्याने त्याप्रमाणे ७ पदे भरणेचा निर्णय घेण्यात आला आहे.

०६/०८/२०१३

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने.**

**सहाय्यक आयुक्त,प्रशासन**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी १८**